## : प्रकरण ५वे :

# उपसंहार

मराठी ग्रामीण कथा हा वाङ्मय प्रकार १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात उदयास आला. सुरुवातीला हरिभाऊ आपटे यांच्या 'काळ तर मोठा कठीण आला' या कथेकडे मराठी ग्रामीण कथेची स्फूर्तीदायी म्हणून पाहिले गेले. या कथेला वास्तवतेचा आधार असल्याने एकजिन्सी संस्कार घडविणारी ती कथा ठरली. त्यामुळे तिने मराठी ग्रामीण कथेचा पाया घातला गेला असे म्हटले गेले.

ग्रामीण कथेला स्पष्ट रूप श्री. म. माटे यांच्या कथेने दिले कारण त्यांचा 'उपेक्षितांचे अंतरंग' हा कथासंग्रह ग्रामीण कथेला अद्‌भूतता, कल्पनारम्यता व काव्यमयता या बंधनातून मुक्त करतो. समाज सुधारणेच्या तळमळीतून लिहिलेली त्यांची कथा सर्वांच्या सुखदु:खाशी एकरूप होते. तेव्हा उपेक्षित जीवनाचे सखोल चित्रण करून ती मराठी कथेत प्रभावी ठरली. याहीपेक्षा मराठी ग्रामीण कथा स्वतंत्र ग्रामीण जीवनाचा अविष्कार घेऊन व्यंकटेश माडगूळकरांच्या कथेच्या रुपाने ती पुढे आली. तिच्यातील प्रभावी व्यक्तिचित्रणे, वास्तव जीवन, स्पष्ट निवेदन यामुळे ग्रामीण कथेत त्यांची कथा श्रेष्ठ तर ठरलीच पण कथा विकसाच्यादृष्टीने ती महत्त्वाचा टप्पा ठरली.

या बरोबरच ग्रामीण कथेत वि. स. सुखटणकर, ग. ल. ठोकळ, र. वा. दिघे, चि. अ. मराठे, ग. दि. माडगूळकर, वामन चोरघडे, द. र. कवठेकर यांची कथा त्यांच्या स्वतंत्र प्रदेशाचे चित्रण करून गेली. तिनेही मराठी ग्रामीण कथेत कमी जास्त स्वरुपात आपले स्थान टिकवून ठेवले.

म. भा. भोसले यांची ग्रामीण कथा स्वातंत्र्याच्या आगेमागे लिहिली गेलेली दिसते. मराठी ग्रामीण साहित्यात भोसले यांचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. ग्रामीण जीवनावर प्रेम करून त्याचे जिव्हाळ्याचे वर्णन त्यांनी आपल्या वाङ्मयातून केले. १५ जुलै १९१४ रोजी भिलवडी, औदुंबर नजीक धनगांव येथे एका अशिक्षित कुटुंबात त्यांचा जन्म झाला. पुढे शेतकरी किंवा फौजदार व्हायचे स्वप्न असूनही ते मास्तर झाले व लेखक बनले.

ग्रामीण साहित्यात भोसले यांनी स्वत:चे एक स्थान निर्माण केल्याने त्यांचे वाङ्मयीन

कर्तृत्व फार मोठे आहे. 'आजोबाची डायरी' ही त्यांची पहिली कथा 'निर्भीड' मासिकातून प्रकाशित झाल्यानंतर त्यांच्या वाङ्मयाला सुरूवात झाली. पुढे 'गार सावली' हा त्यांचा पहिला कथासंग्रह प्रकाशित झाला. त्याच बरोबर त्यांच्या 'समरांगण' पाठोपाठ चार कादंबऱ्या प्रकाशित झाल्या.

भोसले यांनी आपल्या कथालेखनातून उत्सुकता वाढविणारे प्रसंग चित्रित केले याचे कारण त्यांनी शेतकरी, शेतमजूर यांचे जीवन जवळून पाहिले आहे. त्यामुळे त्यांच्या विषयीची तळमळ त्यांच्या मनात निर्माण झाली. 'अहेव लेणं', 'नांदाय जाते', 'पाहुणेर' या कथासंग्रहानी त्यांचे चित्रण केले. 'ग्रामीण कथा' हा मानवी भावनांचे विविध रूपी दर्शन घडविणारा कथासंग्रह ठरल्यानंतर त्यांचा 'कथा जन्माची कथा' हा कथासंग्रह कथेच्या जन्मापूर्वीची कथा सांगणारा ठरला.

म. भा. भोसले हे ग्रामीण परिसराचे अतिशय तळमळीने लेखन करणारे लेखक आहेत. कथा, कादंबरी, नाटक, बाल वाङ्मय या क्षेत्रातही त्यांनी आपला ठसा उमटविला आहे. ग्रामीण परिसरात वावरुन लेखन करताना त्यांनी सामाजिक जाणीव ठेवली आहे. त्याच बरोबर त्यांनी उपेक्षितांच्या दु:खाचाही वेध घेतला आहे. त्यामुळे ग्रामीण वाङ्मयात त्यांचे स्थान महत्त्वपूर्ण आहे.

भोसले यांच्या घरच्या पूरक वातावरणने त्यांच्या व्यक्तिमत्वाला वळण प्राप्त झाले. तर 'हिंदोळ्यावर' या कादंबरीच्या वाचनाने त्यांच्यात वाचनाची आवड निर्माण झाली. त्यांनी प्रचंड वाचन केले ते 'किर्लोस्कर' चे वर्गणीदार झाले. आणि त्या आवडीनेच त्यांना लेखनाचे तंत्र सापडले व ते लिहू लागले. त्याच बरोबर वि. स. खांडेकर, ना. सी. फडके यांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर पडला साहजिकच त्यांचे लेखन त्या वळणाने गेले. पुढे पुण्यात ग. ल. ठोकळ व सरोजिनी बाबर यांच्या भाषणांचाही प्रभाव ' गार सावली' या कथासंग्रहाच्या प्रकाशनाच्यावेळी त्यांच्यावर पडला तेव्हा हे सर्व त्यांच्या कथावाङ्मयाला प्रेरणादायी ठरले.

म. भा. भोसले यांच्या 'अहेव लेणं' व 'ग्रामीण कथा' या कथासंग्रहातून व्यक्त झालेल्या कथेची वैशिष्ट्ये त्यांच्या कथा लेखनाचा अभ्यास करताना महत्त्वपूर्ण ठरतात. त्यांचा पिंडच ग्रामीण परिसरात घडल्याने ग्रामीण जीवनाविषयीचे आकर्षण त्यांच्या मनात निर्माण झाले. त्यामुळे शेतकरी

वर्गाचे प्रभावी चित्रण त्यांच्या कथेतून केले गेले 'अहेव लेणं' ही कथा शेतकरी वर्गाच्या कौटुंबिक प्रेमाचे चित्रण करण्यात महत्त्वपूर्ण ठरली. ग्रामीण परिसरात शेतकऱ्याच्या वाट्याला येणाऱ्या दारिद्र्याचे चित्रण त्यांच्या कथेतून झाले. त्याचबरोबर भाऊबंदकी, अस्पृश्यता, मुक्या प्राण्यावरील प्रेम, त्यांच्या वाट्याला येणाऱ्या दु:खाच्या असह्य वेदना, बलुतेदारी पद्धत, अंधश्रद्धा, मानवता या साऱ्या गोष्टी त्यांच्या कथेतून चित्रित झाल्या त्यामुळे कथा वाङ्मयात त्यांची कथा प्रभावी दर्जाची ठरली.

भोसले यांनी ग्रामीण साहित्याला स्वतंत्र स्थान प्राप्त करून दिल्यामुळे त्यांच्या कर्तृत्वाचा वेगळाच परिचय होतो. कथेत ग्रामीण चित्रण प्रभावी व्हायला ते कथानकाला जास्त प्राधान्य देतात. मुळात त्यांची कथा अनुभवाला जास्त प्राधान्य देत असल्याने ती समृद्ध बनली आहे. त्यांच्या कथेतील पात्रांचे स्वभाव चित्रण त्या कथेला साजेसे ठरते. मानवी मन कोणत्याही मानवी दु:खाने कसे व्याकुळ होते याचे चित्रण त्यांच्या कथेतून येते. कथेतील घटना, प्रसंग प्रभावीपणे चित्रित करण्यासाठी ते योग्य ती वातावरण निर्मिती करतात. तर आपल्या कथेतून संवादाचा वापर करून ते माणसांचे मनोव्यापार उलगडून दाखवितात. आपल्या कथेतून निवेदन शैलीचा वापर करून ते कथेचे सामर्थ्य दाखवून देतात.

या साऱ्या गोष्टीमुळे त्यांची कथा रंगतदार बनली आहे. वास्तवता हा त्यांच्या कथेचा महत्त्वाचा भाग असल्याने ग्रामीण कथेत तिला योग्य ते स्थान मिळाले आहे.

या प्रबंधिकेच्या चौथ्या प्रकरणातून 'अहेव लेणं' आणि 'ग्रामीण कथा' या कथासंग्रहातील म. भा. भोसले यांची कथा, त्यांच्या कथासंग्रहाची नेमकी वैशिष्ट्ये, त्यांच्या कथेचे यशापयश व या दोन कथासंग्रहाबाबत विविध समीक्षकांचे आक्षेप या बाबतीतचा विचार केला आहे. तर म. भा. भोसले यांच्या एकूण कथा वाङ्मयाच्या संदर्भात 'अहेव लेणं' व 'ग्रामीण कथा' या कथा संग्रहाचे स्थान काय आहे? एकूण मराठी कथेत त्यांचे स्थान काय ? त्यांच्या कथालेखनाचे सामर्थ्य व मर्यादा लक्षात घेतल्या आहेत. नवकथेच्या काळात वाङ्मयाच्या दृष्टीने त्यांची कथा परिपूर्ण असूनही अपयशी ठरली याचे कारण ती एकपदरीच चित्रण करते, तिच्यातील संघर्ष प्रभावी नाही, तसेच तिचे कथाबीज मर्यादित आहे या सर्वांमुळे त्यांची कथा चांगल्या दर्जाची आहे इथंपर्यंत आपण पोहचलो.

अशा रीतीने म. भा. भोसले यांच्या कथेचा सर्वांगीण अभ्यास केल्यानंतर त्यांच्या कथा

लेखनाचे विशेष काय ? ग्रामीण कथाकार म्हणून कथावाङ्मयाच्या दृष्टीने त्यांचे स्थान काय याचे एकूणच स्वरुप स्पष्ट व्हावे.

****